**ठळक बातम्या**

- तुकडेबंदी कायद्यातल्या जाचक अटी शिथिल करणाऱ्या विधेयकाला विधानसभेची मंजुरी

- फळपीक विमा योजनेत नोंदणी करण्यासाठी १५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

- अनिल अंबानीच्या दोन कंपन्या विरोधात सीबीआयकडून FIR दाखल

आणि

- ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांच्यावर पुण्यात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**<><><><><>**

तुकडेबंदी कायद्यातल्या जाचक अटी शिथिल करणारं विधेयक आज विधानसभेत मंजूर झालं. यामुळं सर्व जमीन धारकांची नावं सात बाऱ्यावर येतील आणि लहान भूखंडाची खरेदी विक्री सुलभ होईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

- **- - होल्ड - बावनकुळे - -**

या नवीन विधेयकामुळे आता विकास आराखडा किंवा प्रादेशिक आराखडा मंजूर असलेल्या क्षेत्रात वेगळ्या 'एनए' परवानगीची गरज भासणार नाही. त्याऐवजी 'एक वेळचे अधिमूल्य' भरून ही प्रक्रिया पूर्ण करता येईल, असं या विधेयकात स्पष्ट करण्यात आले आहे. विधीमंडळाच्या इतर कामकाजाविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून..

- **- होल्ड - कॅप्सूल - -**

*(सार्वजनिक विश्वस्त कायद्यात बदल करणारं विधेयकही आज विधानसभेनं मंजूर केलं. भीक मागण्यास प्रतिबंधक करणारं विधेयक आणि ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती सुधारणा विधेयक विधान परिषदेत मंजूर झालं. याशिवाय नगर परिषद, नगर पंचायती, औद्योगिक नगरी सुधारणा विधेयकालाही विधान परिषदेनं मंजुरी दिली.*

*राज्यात इतर मागास प्रवर्गातल्या विद्यार्थ्यांसाठी ६५ वसतीगृहं असून इतर जिल्ह्यांमधे वसतीगृहासाठी जागा संपादित केली जात आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात दिली. राज्यातल्या शाळा, महाविद्यालयांच्या परिसरात पान, तंबाखू, तसंच अंमली पदार्थ मिळण्याच्या प्रकरणी गुन्हे*

*दाखल करण्यात आले असून, कायद्यात बदल करून अशा प्रकरणांमध्ये मकोका लावण्यात येईल, असंही मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितलं. पान टपऱ्या उध्वस्त करण्याच्या सूचना सर्व महापालिका, नगरपालिकांना देण्यात आल्या असल्याची माहिती, गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली.*

*छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथे छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा बसविण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. लोकसभेतील एका लेखी उत्तरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या प्रस्ताव नाकारल्याची माहिती दिली गेली होती त्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. .या स्थानकासाठी नवीन आराखडा मंजुरीच्या प्रतिक्षेत आहे. त्यानंतर काम सुरु करणार आणि पुतळा उभारणार अशी ग्वाही त्यांनी दिली.*

*बिबट्यांचा वावर असलेल्या परिसरातल्या शाळा, गस्तीमध्ये स्थानिकांचा सहभाग अशा प्रश्नांवर  लोकप्रतिनिधी, वन आणि महसूल विभागाचे अधिकारी यांची संयुक्त बैठक घेऊन सर्व प्रश्न सोडविण्याचं आश्वासन वनमंत्री गणेश नाईक यांनी लक्षवेधीच्या उत्तरावर दिली.*

- ***- होल्ड - गणेश नाईक - --***

*हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे माझा दवाखाना ही योजना अधिक व्यापकपणे राबवण्यात येईल अशी माहिती सार्वजनिक आरोग्य आणि  कुटुंबकल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधान परिषदेत दिली. या योजनेतून ६०४ दवाखाने आणि १ हजार ६४३ आरोग्य केंद्रे सुरु झाली आहेत अशी माहिती त्यांनी दिली. राज्यातल्या महिला आणि बालसुधारगृहांमधली सुरक्षा रक्षकांची रिक्त पदं महिनाभरात भरण्याचं आश्वासन महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानपरिषदेत दिलं. जलसंधारण प्रकल्पांमधील अनियमितता आणि आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणांच्या चौकशीसाठी SIT स्थापन करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.)*

**<><><><><>**

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेसाठी नोंदणी करण्याची मुदत १५ डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आल्याचं कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितलं. नोंदणी पडताळणी प्रक्रियेत उशीर झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना सहभाग घेता आला नाही, त्यामुळे

याची मुदत वाढवण्याची मागणी केली जात होती. त्यानुसार रब्बी हंगामातल्या सर्व अधिसूचित जिल्ह्यांसाठी नोंदणीची मुदत वाढवण्याबाबत राज्य सरकारने केंद्र सरकारशी पत्रव्यवहार केला होता. या पत्राची दखल घेऊन आंबा, संत्रा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांना फळपीक विमा योजनेसाठी नोंदणी करण्यासाठी मुदतवाढ मिळाली आहे.

<><><><><>

राज्य निवडणूक आयोगानं आज जाहीर केलेल्या सुधारित मतदार यादी कार्यक्रमानुसार महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभागनिहाय मतदारयाद्या प्रसिद्ध करायची मुदत ५ दिवस, म्हणजे १५ डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. तसंच मतदान केंद्रांच्या ठिकाणी प्रसिद्ध करायची मुदतही २७ डिसेंबरपर्यंत वाढवली आहे.

<><><><><>

सुमारे १४ हजार ८०० कोटी रुपयांच्या गैरव्यवहारप्रकरणी सीबीआयनं अनिल धीरुभाई अंबानी उद्योगसमूहातल्या दोन कंपन्यांविरोधात आज एफआयआर दाखल केले. रिलायन्स होम फायनान्स लिमिटेड आणि रिलायन्स कमर्शियल फायनान्स विरोधात हे गुन्हे दाखल झाले आहेत.

युनियन बँकेला २२८ कोटी रुपयांना फसवल्या प्रकरणी कंपनीचा तत्कालीन संचालक - अनिल अंबानींचा पुत्र जयअनमोल अंबानी तसंच कंपनीचा माजी मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र शरद सुधाकर यांना आरोपी बनवलं आहे.

बँक ऑफ महाराष्ट्रला ५७ कोटी रुपयांना फसवल्याचाही कंपनीवर आरोप आहे. एफआयआर दाखल झाल्यावर सीबीआयने मुंबईत उद्योगपती अनिल अंबानी यांच्या निवासस्थानी तसंच आरसीएफ एलचा माजी संचालक देवांग मोदी याच्या पुण्यातल्या निवासस्थानी छापे टाकून झडती घेतली. रविंद्र सुधाकर याच्या घरावर छापा कारवाई सुरु आहे.

<><><><><>

महसूल गुप्तचर संचालनालयानं वर्ध्याजवळच्या करंजा घाडगे इथं एका बेकायदा मेफेड्रॉन उत्पादन केंद्रावर छापा टाकून १९२ कोटी रुपये किंमतीचे १२८ किलो अंमली पदार्थ जप्त केले आहेत. तसंच हा पदार्थ तयार करण्यासाठी वापरली जाणारी रसायनं आणि

सामग्रीही जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी तिघांना ताब्यात घेतल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. याचा पुढचा तपास सुरू आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर बाबा आढाव यांच्यावर संध्याकाळी पुण्यात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार झाले. सकाळपासून मार्केट यार्डमधल्या हमाल भवनात त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं. बाजारपेठेशी निगडीत हमाल, तोलार, मापाडी यांनी बाबा आढाव यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सकाळपासूनच रांग लावली होती.

**<><><><><>**

धुळ्यातल्या गुरुद्वाराचे प्रमुख बाबा धीरजसिंग यांच आज सकाळी मुंबईत कोकिलाबोन रुग्णालयात निधन झालं. गुरुद्वाराच्या आवारात एक डिसेंबरला त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला होता.

**<><><><><>**

नववर्षाच्या स्वागत समारंभांच्या पार्श्वभूमीवर मुंबईत येत्या २२ डिसेंबर ते २८ डिसेंबर दरम्यान अग्निशमन दलातर्फे विशेष अग्निसुरक्षा मोहीम राबवण्यात येणार आहे. या मोहिमेत विविध रेस्टॉरंटस्, हॉटेल्स्, बार, पब, लॉजिंग-बोर्डिंग, पार्टी हॉल्स्, जिमखाने, बँक्वेट हॉल्स्, अतिगर्दी होणारे मॉल्स्, तारांकित हॉटेल्स अशांची तपासणी केली जाईल.

**<><><><><>**

राज्यात बऱ्याच ठिकाणी गारठा वाढला आहे. धुळे शहर आणि जिल्ह्यात पुन्हा थंडीची लाट पसरली असून आज पारा ५ पूर्णांक ३ दशांश अंश सेल्सीअसपर्यंत घसरला. उत्तरेकडून थंड वारे वाहत असल्यानं हुडहुडी वाढली आहे. नाशिक जिल्ह्यात निफाड तालुक्यात आज ५ पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. नाशिक शहरातही पुन्हा थंडी वाढली असून आज सकाळी ९ पूर्णांक ३ दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तर, अहिल्यानगरमध्ये ७ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस तापमान नोंदवलं गेलं. सोलापूर जिल्ह्यात यंदाच्या हंगामातल्या सर्वात कमी १२ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद आज झाली.

गेल्या २४ तासात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली. येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी थंडिची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहिल.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना आज ओदिशात कटक इथल्या बाराबती मैदानावर सुरू आहे. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शुभमन गिल हा ४ धावा काढून तिसऱ्याच चेंडूवर बाद झाला. शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १ षटकात १ बाद ५ धावा झाल्या होत्या.

पाच सामन्यांच्या या मालिकेतला दुसरा सामना येत्या गुरुवारी चंदीगडमधे, तिसरा सामना धर्मशाळा इथं, चौथा लखनऊमध्ये, आणि शेवटचा सामना अहमदाबादमधे होणार आहे.

//<><><><><>//